# सहा आंधळे आणि हत्ती

## भारतीय लोककथा




# सहा आंधळे आणि हत्ती

## भारतीय लोककथा



**मराठी : अश्विनी बर्वे**



खूप आधी भारतात सहा आंधळे लोक राहत होते. ते बघू शकत नव्हते, पण त्यांनी जगाबद्दल इतर अनेक गोष्टीतून जाणून घेतले होते, माहित करून घेतले होते.



ते कानांनी बासरीचे सूर ऐकू शकत होते.




ते आपल्या बोटांनी रेशमाची
कोमलता जाणून घेवू शकत होते.

ते शिजवलेल्या अन्नाचा सुंगध घेवू शकत होते आणि त्याचा मसालेदार स्वाद चाखू शकत होते.





ते सर्व मिळून आपल्या घराची
देखभाल करत आणि खुश राहत होते.



मग एक दिवस या अंध लोकांनी
एक रोमांचक बातमी कली.
राजकुमाराच्या महालात एक
नवा हत्ती आला होता.

या अंध लोकांनी हत्तीच्या बाबत ऐकले होते पण ते त्याला कधी भेटले नव्हते. हत्ती कसा असतो? हे त्यांना बिलकुल माहित नव्हते.



“चला आपण राजकुमाराच्या महालात जाऊ या,” त्यातल्या एका अंधाने म्हटले. “तेव्हा आपल्याला कळेल की हत्ती वास्तवात कसा असतो.”



आणि ते महालाकडे निघाले. महालापर्यंतचा प्रवास लांबचा होता. तिथे पोहचेपर्यंत त्यांना तहान लागली होती.

पण ते पाणी पिण्यासाठी थांबले नाही. कारण ते हत्तीला स्पर्श करायला उत्सुक होते.



शेवटी ते महालात पोहचले.
एका रक्षकाने त्यांना येण्याचे कारण विचारले.
अंधांनी त्यांचे येण्याचे कारण सांगितले.

"नक्कीच, तुम्ही हत्तीला स्पर्श करू शकतात," रक्षक म्हणाला. "मला खात्री आहे राजकुमाराला यात काही वावगं वाटणार नाही."



मग रक्षकाने त्यांना हत्तीजवळ नेले.
हत्ती बागेत चुपचाप उभा होता.



पहिल्या अंधाने हत्तीच्या पोटाला स्पर्श केला

“तो खूप मजबूत आणि रुंद आहे,” त्याने विचार केला.
“मला वाटते हत्ती दारासारखा आहे.”



दुसऱ्या अंधाने हत्तीची लांब,गोल सोंडीला स्पर्श केला. “अरे तो तर सपा सारखा आहे!” तो ओरडला.






तिसऱ्या अंधाने हत्तीच्या दाताला पकडले.
“काय, हा हत्ती तर भाल्या सारखा टोकदार आहे!”

चवथ्या माणसाने हत्तीचा पाय पकडून बघितला, आणि विचार केला की, हत्ती झाडासारखा गोल आणि कडक आहे.

पाचव्या अंधाने हत्तीचा कान पकडला, कान खूप खूप मोठा होता. हत्तीने कान फडफडवले. पाचवा माणूस हसला, "हत्ती तर पंख्या सारखा आहे."



सहाव्याने हत्तीची लांब, बारीक शेपटीला हात लावला. “हत्ती तर दोरीसारखा आहे,” त्याने विचार केला.





आतापर्यंत दुपार झाली होती, आकाशात सुरु तळपत होता.

मग रक्षकाने या सहा लोकांना झाडाच्या सावलीत बसवले. “तुम्ही इथे आराम करा,” तो म्हणाला. “तोपर्यंत मी तुमच्यासाठी पाणी घेवून येतो.”



वाट बघत असतांना त्या सहाजणांनी हत्तीच्या बाबत चर्चा केली..

“कोणी मला म्हटले नाही की हत्ती दारा सारखा आहे,” पहिला माणूस म्हणाला.

“एक दार?” दुसऱ्याला आश्चर्य वाटले.

“अरे, नाही, तो तर एका सापासारखा आहे.”



तिसऱ्या माणसाने डोकं हलवलं, “हत्ती तर एका भाल्या सारखा आहे.”

“काय?” चवथा माणूस म्हणाला. “नाही, हत्ती झाडाच्या एका डहाळी सारखा आहे.”

पाचवा माणूस ओरडला, “एक दार? एक साप? एक भाला? एक झाड? तुम्ही सगळे चुकत आहात. खरंतर हत्ती एका पंख्या सारखा आहे.”



“नाही! तो एका दोरीसारखा आहे!”
सहावा माणूस ओरडला.

थोड्यात वेळात सगळ्या बागेत
रागाने भरलेले आवाज येवू लागले.





ते आवाज हत्तीचे वर्णन
करणाऱ्या सहा आंधळ्यांचे होते.

“एक दार!” “एक साप!” एक भाला!”
“एक झाड!” “एक पंखा!” एक दोरी!”



त्यांच्या आवाजाने राजकुमाराची झोप मोडली. राजकुमार दुपारची डुलकी घेत होता. शांत व्हा!” त्याने म्हटले. “हे बघा, मी झोपण्याचा प्रयत्न करत आहे!”

“आम्हांला वाईट वाटतं,” पहिल्या अंधाने सांगितलं. “पण हत्ती कसा आहे यावर आमचं एकमत होत नाही. आमच्यातल्या प्रत्येकाने हत्तीला स्पर्श केला आहे, पण प्रत्येकाला हत्ती अगदी वेगळा वाटत आहे.”



राजकुमार हळुवारपणे म्हणाला, ”हत्ती तर मोठा प्राणी आहे. त्याची पाठ दारासारखी असते, त्याची सोंड सापासारखी, त्याचे दात भाल्यासारखे टोकदार, त्याचे पाय झाडाच्या एखाद्या फांदी सारखे, त्याचे कान पंख्यासारखे आणि त्याची शेपूट दोरीसारखी असते.





“तर तुम्ही सगळेजण बरोबरच आहात. पण त्याच बरोबर चुकीचे सुद्धा आहात. कारण तुम्ही प्रत्येकाने हत्तीच्या केवळ एकाच भागाला स्पर्श केला होता.

हत्ती नक्की कसा आहे, हे बघण्यासाठी तुम्हांला हत्तीच्या प्रत्येक भागाला स्पर्श करून बघावं लागेल.”




अंध लोकांनी राजकुमारच्या म्हणण्याचा विचार केला, त्यांच्या लक्षात आले की राजकुमार खरोखरच बुद्धिमान आहे.



“मी तुम्हांला हत्तीबद्दल अजूनही काही सांगेन, राजकुमार म्हणाला. “पण हत्तीवरची सवारी फार मजेशीर असते, तुम्हांला हत्तीवर बसून घरी जायला आवडेल का?”





मग त्या सहा अंधांनी तेच केलं.



आणि आता ते एक दुसऱ्याशी सहमत होते त्यांचा अनुभवाचा तोच भाग सगळ्यात चांगला होता.

शेवट